चिपळूण नगर परिषद

## निविदा सुचना

(अभिलेख व भांडार विभाग)

चिपळूण नगर परिषदेचे उपयोगाकरीता खालील वर्णनाच्या वस्तुंचा पुरवठा करणेसाठी दोन लखोटा पध्दतीने सीलबंद निविदा मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाज पत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम डीडी अथवा मुदत ठेव स्वरूपात | पुरवठादाराची पात्रता | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण नगर परिषेदकडील विविध विभागांकडील माहिती नागरीकांना उपलब्ध होणेसाठी स्पर्श पटल यंत्रणा पुरविणे. | १,५०,०००/- | ५,०००/- | १. दुकाने नोंदणी प्रमाणपत्र.<br>२. अनुभवाचा दाखला | १ महिना | ५००/- |

१. निवीदा फॉर्म  दिनांक २२/१०/२००८ पर्यत म्यु.पल रेकॉर्ड विभागात सायं. ५ पर्यंत मिळतील.
२. परीपूर्ण सिलबंद निविदा दिनांक २४/१०/२००८ रोजी दुपारी २.०० पर्यत प्रशासकीय अधिकारी,चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.
३. प्राप्त निविदा धारकांच्या निविदा शक्यतो त्याच दिवशी सायं. ४.०० वा. पर्यंत उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येतील.

उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
कामासंबधी माहिती नगर परिषद अभिलेख व भांडार विभागात पहावयास मिळेल.  सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत.  किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
कोणतेही निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहेत.

निविदा सुचना क्रमांक ०८१०३५
दिनांक : १४/१०/२००८

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

## सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.
२. निविदा फॉर्म लेखा विभागात आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.
३. यशस्वी ठेकेदार यांनी करारनाम्यासोबत अनामत रक्कम भरली नाही अथवा करारनामा विहीत मुदतीत केला नाही तर भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.
४. निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत न भरल्यास बयाणा रक्कम जप्त होईल. निविदा उघडल्यापासून १२० दिवसांत नगर परिषदेने काहीही न कळविल्यास निविदा धारकाला निविदा मागे घेता येईल व अशा वेळी बयाणा रक्कम परत मिळेल. निविदा दिनांकापासून १२० दिवसापर्यत वैध राहील.
५. अयशस्वी निविदा धारकांना निविदा नामंजूर झाल्याचे कळविल्यानंतर किंवा १२० दिवसांनंतर अर्ज केल्यानंतर अर्ज केल्यावर बयाणा रक्कम परत देण्यात येईल.
६. निविदा स्विकृतीबाबत ठेकेदार यांना पत्राने कळविण्यात येईल.
७. निविदा धारकांनी कामाची निविदेमध्ये पुरवठा करणाऱ्या वस्तुंची किंमत तसेच कंपनीचे नांव, मेक व त्यासंबधीचे माहिती पत्रक असल्यास निविदेसोबत जोडावे व किंमत अक्षरी लिहून सही करणे आवश्यक आहे. अक्षरी व आकडी यामध्ये फरक आढळल्यास दोन्हीमधील सर्वात कमी दर स्विकृत करण्यात येईल.
८. निविदा सादर करण्याची पध्दत
    १. निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.
    २. निविदा लखोटा एक मध्ये कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्या असल्यास लखोटा एक मध्ये ठेवणे आवश्यक आहे.
    ३. भागीदारी फर्म असल्यास भागीदारी पत्राची सत्यप्रती लिपी व अधिकार पत्र जोडणे आवश्यक आहे.
    ४. दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव ठेकेदाराचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.
    ५. आयकर पॅनकार्डच्या सत्यप्रती लिपी व वॅट रजिस्ट्रेशनचा दाखल्याची सत्यप्रत लिपी सोबत जोडणे आवश्यक आहे.
    ६. निविदेमध्ये दर टाकलेल्या कंपनीचे अधिकृत विक्रेते अथवा अधिकृत पुरवठादार किंवा उत्पादक असल्याबाबत आवश्यकतो कंपनीचा दाखला सत्यप्रती लिपी असणे आवश्यक आहे.

७. लखोटा क्रमांक १ मध्ये विशिष्ठ मालाचा पुरवठा करणेसाठी शासनाचे् परवाना आवश्यक असल्यास त्याची सत्यप्रतिलिपी असणे आवश्यक आहे.

९. निवदा उघडणे

९.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छानणी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.

९.२ दुसरे दराचा सिलबंद लखोटा लखोटा क्रमांक १ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.

९.३ निविदा लखोटा क्रमांक १ मधी्ल कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.

९.४ कामाचे बाबतीत किंवा कागदपत्राचे बाबतीत कोणताही बदल आवश्यक असल्यास त्याबाबत निविदा फॉर्म खरेदी करणारे ठेकेदार यांना पत्राने तसेच वर्तमान पत्रात त्याबाबत आवश्यकती शुध्दीपत्रक निविदा सादर करण्याच्या दिवसापूर्वी प्रसिध्द करणेत येईल.

९.५ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्रमांक १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

१०. यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

११. मंजूर निविदा धारकांना निविदा मंजूरीबाबत कळविल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत रोखीने अथवा मुदत ठेवीने न भरल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

१२. कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

१३. नगर परिषदेसाठी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) विकसित करणेकामी निवीदा मंजूर झाल्यावर सोबतचे करारनाम्याप्रमाणे करारनामा करावयाचा आहे.

१४. नगर परिषदेसाठी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) विकसित करणार यांना कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम मिळणार नाही.

१५. स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) मध्ये करावयाचे बदल स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) पुरवठादार यांनी नगर परिषदेमध्ये तात्काळ करून द्यावयाचे आहेत.

१६. कामासंबधी अहवाल लिपीक, संगणक विभाग यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१७. नगर परिषदेसाठी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) कामी असणारे सोर्सकोड अद्ययावत करून मुळ प्रत (सॉफ्ट कॉपी) देणे बंधनकारक आहे.

१८. नगर परिषदेसाठी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) तयार करणेकामी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) विकसित करणार यांचे कामासंबधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास याबाबत नगर परिषदेचा निर्णय अंतीम व बंधनकारक असेल.

१९. स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क)विकसीत कामी अन्य कोणत्याही प्रकारचे आवश्यक ते परवाने स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) विकसीत करणार यांनी स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणतीही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

२०. नगर परिषदेसाठी स्पर्श पटल यंत्रणा (टच स्क्रिन कियॉस्क) विकसीत करणार यांनी निविदा भरल्यानंतर बाजारभावात वाढ झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणांनी देकाराची मुदत संपेपर्यंत कोणतीही भाववाढ देणेत येणार नाही.

२१. निविदा देकार मंजूर झाल्यास सेवा पुरवठाधारकाला योग्य मुद्रांकावर करारनामा करुन घ्यावा लागेल. करारनाम्यातील अटी व शर्ती सेवा पुरवठाधारकावर बंधनकारक असतील.

२२. निविदा भरण्यापूर्वी नगर परिषदेचे संगणक विभागाकडे संपर्क साधून कामाची व्याप्ती नगर परिषदेची आवश्यकता यासंबधी माहिती घेवूनच निविदा भरावयाची आहे.

मुख्याधिकारी
चिपळूण नगरपरिषद